PARLE MAHOTSAV
Organiser - MLA ADV. PARAG ALAVANI, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. २१.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

# १५व्या पार्ले महोत्सवाचे शानदार उद्घाटन

# पार्ले महोत्सव युवाशक्तीचे व्यासपीठ बनावे- मुख्यमंत्री

मुंबईः  आपले राज्य हे युवाशक्तीचे राज्य आहे. युवाशक्तीला मैदान मिळाले तर क्रीडाक्षेत्रात ती काय करु शकते, हे आपल्याला माहितीच आहे. आमचे विधी मंडळातील सहकारी अॅड. पराग अळवणी यांच्या पार्ले महोत्सवाने युवाशक्तीला सक्षम व्यासपीठ मिळवून दिले आहे. मुलांमध्ये शिक्षणाबरोबरच कला-क्रीडागुण जोपासले जावेत यासाठी आमचे सरकार प्रयत्न करणार आहे. परंतु पार्ल्यात काहीतरी वेगळेपणा आहे हे या महोत्सवाने दाखवून दिले आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी काढले. क्रीडाज्योत प्रज्ज्वलित करून त्यांनी रविवारी, २१ डिसेंबर २०१४ रोजी १५व्या पार्ले महोत्सवाचे उद्घाटन केले.

यावेळी केंद्रिय संरक्षणमंत्री मा. मनोहर पर्रिकर म्हणाले की, समोर जी खेळाडूंची उदंड उपस्थिती आहे, हेच पराग अळवणी यांचे यश आहे. पार्ले महोत्सव उत्तरोत्तर भरभराटीकडे जावो. मीदेखील पार्लेकर असल्याचा आज मला अभिमान वाटतो. पार्ले ही सांस्कृतिक आणि क्रीडा राजधानी बनली आहे, असे उद्गार खा. पूनम महाजन यांनी काढले. काळाप्रमाणे जे महोत्सव बदलतात ते तारुण्याला साद घालतात. पार्ले महोत्सव काळाप्रमाणे बदलणारा आहे म्हणून तो चिरतरुण आहे. आमचे सरकार बुद्ध्यांकाबरोबर भावनांक वाढवण्यावर भर देणार आहे. खेळामुळे भावनांक वाढत असतो. त्यादृष्टीने पार्ले महोत्सवाचे महत्व विशेष आहे. असे उद्गार राज्याचे शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री मा.विनोदजी तावडे यांनी काढले.

उद्घाटनाच्या सुरूवातीला आयोजक आमदार अॅड. पराग अळवणी यांनी प्रास्ताविकात महोत्सवाचा धावता आढावा घेतला. १५ वर्षापूर्वी जेव्हा या महोत्सवाची सुरूवात झाली त्यावेळी केवळ २३०० खेळाडू होते. आज ४१ क्रीडा प्रकारामध्ये जवळपास ३० हजार स्पर्धक सहभागी होत आहेत. खेळातील पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा यांच्या जोडीला तब्बल एक हजार निःस्वार्थी कार्यकर्त्यांचे बळ आणि प्रायोजकांचे सक्षम हात यांमुळे आम्हाला आज हे यश मिळत आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या  रोजगाराभिमुख स्किल डेव्हलपमेंट या संकलपनेला आमच्या या कला-क्रीडेतील टॅलेन्ट सर्चमुळे त्यांना बळ मिळणार आहे. म्हणून आमच्या पार्ले महोत्सवाप्रमाणे तालुक्या-तालुक्यापर्यंत अशा स्पर्धा पोहचल्या पाहिजेत.

सोहळ्याच्या सुरूवातीला नटरंग कला अॅकॅडमीच्या खेळाडूंनी ऱ्हिदमिक योगा व दीप योगाचे प्रात्याक्षिक केले तर समीर आणि अर्श तन्ना यांच्या नृत्यदिग्दर्शनाखाली पंचमहाभूतांवर आधारित मनमोहक नृत्याविष्कार सादर केला.

---------------------------------------------

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.